# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०९/०९/२०२३

**विनयभंगः-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोलीस स्शन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ७२८/२०२३कलम ३५४ अ, ५०९ भादवी | अमरावती | दि ८/०९/२०२३ चे १०/३० वा. दरम्यान<br><br>दा ता वेळ दि. ०८/०९/२०२३ चे १७/१४ वा. | एक महिला | एक अनोळखी इसम वय अं २५ –२६ वर्ष | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी ही ऑटो मध्ये बसली असता एक अनोळखी इसम सुध्दा नंतर वय अं २५ते २६ वर्ष वय असलेला बांधा सडपातळ, ठेंगणा, रंग सावळा, अंगात ब्लु रंगाचे टी शर्ट चेक्सचे शर्ट घातलेला, काळया रंगाचा पॅन्ट अशा र्वणनाचा ऑटोमध्ये बसला व फिर्यादी कडे एकटक पाहुन फि कडे सरकला त्यावर फि ने म्हटले कि उधर सरको भैया त्यावर थोडा बाजुला सरकला व त्या अनोळखी इसमाने फि ला म्हटले कि, मै आपको कुछ टिप्स दु क्या तुम मेरे साथ चलते क्या, आय लव्ह यु असे बोलला त्यावर फि ला त्याची भीती वाटली म्हणुन फि ने तीचे पती याला फोन लावला व संदरलाल चौकात बोलवीले फि चे पती सुंदरलाल चौकात येण्याआधी अनोळखी इसम आरोपी हा तेथुन पळुन गेला, फि ने व फि चे पतीने मो सा वरुन त्यास शोधले परंतु तो मिळुन आला नाही. ऑटो चालक यांना विचारपुस केली असता त्यांनी सुध्दा ओळखत नसल्याचे सांगीतले अशा फियादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

पळवुन नेणेः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | वलगाव अप क्र. 293/2023 कलम 363 भादवि. | ग्राम शिराळा | दि.08/09/2023 चे 12/00 वा. दाखल.दि.08/09/2023 चे 22/04 वा. | मुलाचे वडील | अज्ञात. | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठिकानी यातील फिर्यादि यांनी पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला कि,त्यांचा मुलगा वय 17 वर्ष रा.शिराळा ता.जि.अमरावती यास कोणी तरी अज्ञात चोराने फुस लावुन पळुन नेले अशा फिर्यादिच्या तोंडी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२६/२३ कलम ३६४, १४३ भादवी | अमरावती | दि. ०६/०९/२३ चे २१.३० वा. ते आज पावेतो दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे २२.०६ | एक महिला | जय चौधरी, आयुष टाले, यश रोडगे रा. गोपाल नगर अधिक ३ | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी ला दोन मुले असुन त्यापैकी एक वय २२ वर्ष हा घ.ता. वेळी व तो कामावरुण परत आला नाही फिर्यादीला वाटले की तो मित्राकडे गेला असेल मात्र त्याचा मित्र याने फिर्यादीला सांगितले की दि. ०६/०९/२०२३ रोजी रात्री ९.३० वा. दरम्यान फि. चे मुलाला फोन आला होता. त्याप्रमाणे त्याला तापडिया मॉल येथे दुचाकीने नेले. फि. चा मुलगा हा एका बंद ऑटो मध्ये बसला असता यातील आरोपी यांनी त्याच्या मागे धाउन व त्याला जिवानिशी ठार मारणेकरिता पळुन नेल्याची असा जबाणी रिपोर्ट दिल्याने सदरचा गुन्हा दाखल |

घरफोडी:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२३/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | एचव्हीपीएम फिजीकल लेबॉटरी अमरावती | दि. ०७/०९/२३ चे १७.१५ वा. ते दि. ०८/०९/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १७.४४ | सुधीर अण्णाजी बोंड वय ५८ रा. रवी नगर अमरावती | अज्ञात | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे एचव्हीपीएम मध्ये नोकरीला असुन नमुद घटना ता. वेळी ठिकाणी यातील फिर्यादी यांनी लेबॉटरी डिपार्टमेन्ट व्यवस्थीत बंद करुण दुसरे दिवशी परत सदरचे डिपार्टमेन्ट उघडले असता सदर डिपार्टमेन्ट मधील ॲरीस्ते कंपनीचे ३ फॅन किं. ७५०० रु. २. ॲल्युमिनीयम पार्टीशन १५०० रु. असा एकुण ९०००/- रु. चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने लॅब चे मागील चानल गेटचे लॉक तोडुन नमुद मुददेमाल चोरुण नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे कोतवाली अप क्र.३९५/२३ कलम ४५७, ३८० भादवि | आराधना फॅशन प्रायवेट लि. जयस्तंभ चौक अम. | घ.ता.वेळ ०५/०९/२०२३ चे २२.३० वा. पासुन ते ०६/०९/२०२३ चे १०.३० वा पर्यत<br><br>दा.वेळ ०८/०९/२०२३ चे १६-५१ वा | अक्षय सुरेश कुमार हबलाणी वय ३० वर्ष धंदा - आराधना नावाचे कपडयाचे दुकान रा. प्लॉट नं. २५A सिताराम बाबा कॉलनी शंकर नगर रोड अम. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे मी समक्ष पोस्टे ला येवुन जबाणी रिपोर्ट देतो की मी वर नमुद दिलेल्या पत्यावर कुटुंबासह राहतो व आराधना प्रा. लि. नावाचे कपडयाचे दुकान जयस्तंभ चौक अम. येथे चालवितो मी नमुद दुकानाचा मालक आहे. मी माझे दुकान सकाळी १०.०० वा. उघडतो व रात्री १०.०० वा. बंद करतो मी दि. ०५/०९/२०२३ रोजी मी नेहमी प्रमाणे सकाळी १०.०० वा. उघडले व दिवस भर काम करुण माझ्याकडे बिल्डींग करिता वापरत असलेला माझा **ACER** कंपनिचा लॅपटाप मा. क्र **AP04501022** कि. अं. **25,000/-** लॅपटाप मी काम संपल्यावर दुकानात ठेवतो व रात्री १० वा मी दुकान बंद करून घरी गेलो, दि. ०६/०९/२३ ला मी सकाळी १० वा माझी आराधना नावाचे दुकान उघडले व मी आत मध्ये जावुन बघितले असता मला टेबलवर ठेवलेला लॅपटाप दिसुन आला नाही म्हनुन मी लॅपटापचा दुकानात शोध घेतला असाता मिळुन आला नाही म्हणुनि मी कामगाराना विचारपुस केली असोता कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानातील ग्रील मधुन दुकानात प्रवेश करून चोरून नेला आसावा करीता आज पो.स्टे ला येवुन मी अज्ञात चोरट्या विरूद्ध रिपोर्ट देत आहे. |

वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८१९/२३ कलम ३७९ भादवी | विष्णु नगर कोंचींग क्लासेस च्या समोर अमरावती | दि. ०७/०९/२३ चे १६.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १२.११ | सुधीर दुलीचंद राय वय ४५ रा. टेली कॉम कॉलनी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांचा मुलगा नमुद घटना ता. वेळी ठिकाणी् टयुशनला Hero Hustle २७.५ DDB२१SP कंपनीची ग्रे रंगाची सायकल किं. अं. ७००० रु. सदरची सायकल घेउन गेला व टयुशन संपल्यावर ठेवलेल्या जागी गेला असता सायकल दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरुण नेली. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाख़्ल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२२/२३ कलम ३७९ भादवी | वासल्य हॉस्पीटल रक्मीणी नगर अमरावती | दि. ०२/०९/२३ चे १३.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १६.२५ | रामकृष्ण लक्ष्मणराव गजभिये वय ४८ रा. गाडगेनगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी ठिकाणी् फिर्यादी त्याची टु व्हीलर हीरो स्पेडर गाडी क्रमांक MH२७AY७३०३ किं.अं. २०००० रु.ने त्यांचे ऑफीसला गेले व काम आटपुन बाहेर आले असता त्यांना त्याची गाडी पार्क केलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुण नेली. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाख़्ल |
| ३ | पो स्टे कोतवाली अप क्र.३९६/२३ कलम ३७९ भादवि | बस डेपो , अम | घ.ता.वेळ ०६/०९/२०२३ चे १९.०० वा. पासुन ते ०६/०९/२०२३ चे १९.३० वा पर्यत दा.वेळ ०८/०९/२०२३ चे १८-२३ वा | विनायक संतोबा लिंगायत , वय ३५ , व्यवसाय खाजगी नोकरी रा. ग्राम कळंबा, पो.स्टे ेगुंडा, ता वसमल जि. र्हिंगोली, ह. मु, चंद्रकांत राउत यांचे कडे भाड्याने जिल्हा परिक्षद कॉलनी, प्रशांत नगर अम. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे मी समक्ष पोस्टे ला येवुन जबाणी रिपोर्ट देतो की मी कळबा येथील कायमचा रहीवासी असून सध्या अम. येथे एकटा राहतो मानिकरील विश्वनाथ मुस्तरे रा तरोडा नाका नांदेड यांनी अम. प्राघीकरण विभाग येथील कामाचा ठेका घेतला आहे व फि यांचे कडे सुपरवायजर म्हणुन खाजगी नौकरी करतो मोझे मालकाचे नावावर असलेली दुचाकी होंडा सिबी शाईन क्र MH26BM3963 ही माझे कडे कामाकरीता वापरत् होतो दि, ०६/०९/२३ रोजी सायं ०७.०० वा दरम्यानि मी गाडी सिबी शाईन क्र MH26BM3963 अम् बस ेडपो येथे गाडी उभी करुन् बस चौकशी करीता गेलो असता व परत ७.०० वा दरम्यान आलो तेव्हा माझी गाडी मी् ठेवली तेथे दिसुन आली नीही माझे जवळ असलेली होडां सिबी शाईन क्र MH26BM3963 इंजीन क्र.JC65E72197481 चेसीस क्र ME4JC65AGJ7127784 काळ्या रंगाची जुनी वापरती कि. अं २०,०००/- रु कि. बस डेपो येथुन कोनीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली असे फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाख़्ल |

चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोलीस स्शन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ७२७/२०२३कलम ३८० भादवी | लुंबीनी नगर जान्हवी किराणामागे अमरावती | दि०७/०९/२०२३ चे २०/०० वा.ते ०८/०९/२०२३ चे०६/०० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ दि ०८/०९/२०२३ चे १६/२६ वा. | विलास हरीभाउ रामटेके वय ५४ धंदा ॲडव्होकेट रा पंचशीलनगर वडरपुरा मंदीरा जवळ अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकोर आहे कि यातील फिर्यादी यांची नमुद घटनास्थळी एक रूम आहे त्या रूममध्ये फि यांनी एक महीन्याआधी पिठाची गीरणी सुरु करण्या करीता काम सुरु केल आहे पीठाची गीरणीची मशीन नटबोल्ट लावुन फिट केली आहे व इतर साहीत्याची जुळवाजुळव सुरु होती नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि यांनी दि ०७/०९/२०२३ चे २०/०० वा. रुम बंद करून दुसरे दिवशी ०८/०९/२०२३ चे ०६/०० वा गेले असता फि चे रूमचे तिस—या नंबरचा दरवाजा उघडा दिसला कोणीतरी अज्ञात चोराने फि चे रूमचे भीतीवर चढुन आत प्रवेश पिठाची गीरणीची फिट केलेली मशीन किं ५०००/—रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | नांदगावपेठ अप क्र.३५५/२०२३ कलम ३७९ भादवी | ग्राम रामगाव ता.जि. अमरावती | दि.०३/०९/२०२३ चे रात्री २२/०० वा.ते दि.०६/०९/२०२३ चे २२/०० वा.दरम्यान<br><br>दि.०८/०९/२०२३चे १९/४३ वा. | उमेश सुदामराव भालेराव वय ३९ वर्ष व्यवसाय व्यारार रा.रामगाव ता.जि.अमरावती | अज्ञात | मी समक्ष पो.स्टे.ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की,दि.०३/०९/२०२३ रोजी रात्री १०/००वा.दरम्यान मी किराणा दुकान बंद करुन घरी आलो असता तेव्हा माझ्या स्वतहा च्या मालकीच्या चार बकऱ्या मी घराचे समोर बाधुन ठेवल्या होत्या.सकाळी ०४/०९/२०२३ चे ०६/०० वा.उठुन पोहीले असता बाधुन ठेवलेल्या चार बकऱ्या मधुन दोन बकऱ्या एक वर्ष वयाच्या दोन पाढऱ्या रंगाच्या त्यापैकी एकीच्या मानेवर काळा पट्टा व दुसरीच्या तोंडावर भुरकट पट्टा व लहान सिंग असलेल्या त्यांची कि.१४,००० रु.दिसुन न आल्याने मी घराचे आजुबाजुला व मोकळया परीसरात त्यांचा शोध घेतला असता मिळुन आल्या नाही.तसेच दि.०६/०९/२०२३ रोजी रात्री १०/००वा.दरम्यान मी माझे स्वतहा मालकीची हिरोहोन्डा कंमपनीची मो.सा.क्र.एम एच २७ ए.डी.५०१३ काळया निळया रंगाची कि.अ.२०,००० रु.ची घराचे समोर रोडवर उभी ठेवली होती.दि.०७/०९/२०२३ सकाळी ०७/००व दरम्यान उभी ठेवलेली गाडी दिसुन न आल्याने मी त्या गाडीचा घराचे आजुबाजुला लोकांकडे व गावातील मित्र व नातेवाईकाकडे चौकशी केली असता मिळुन आली नाही.असा एकुन ३४००० रु.चा माल माझ्या घरासमोरुन कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२०/२३ कलम ३७९ भादवी | फिर्यादीचे राहते घरासमोर छांगानी नगर अमरावती | दि.०८/०९/२३ चे ०३.०० वा. ते ०६.०० वा.दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १३.४४ | प्रकाश श्यामराव गावंडे वय ५४ वर्ष रा. छांगानी नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी ठिकाणी फिर्यादी याने सम्राट कंपनीच्या ऑटो घरा समोर उभा असतांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने सम्राट कंपनीच्या ऑटोमधील चार चार्जीग बॅट-या किं.अं. २०००० रु. च्या चोरुण नेल्या. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाख़ल |
| ५ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२१/२३ कलम ३७९ भादवी | विदया विहार कॉलनी हॉटेल रंगोली समोर अमरावती | दि.०७/०९/२३ चे १७.०० वा. ते दि.०८/०९/२०२३ चे ०८.०० दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १५.३३ | लक्ष्मण दत्ताराव मोरे वय ३२ वर्ष रा. यादव लेआउट सातुर्णा अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी ठिकाणी फिर्यादी याचे घराचे व दवाखानाचे काम चालु आहे तेथे बांधकामासाठी लागणारे इलेक्टीक वायरचे सात बंडल कि. २०००० रु २. कीर्लोस्कर कंपनीची पाण्याची मोटर किं अं. ५००० रु असा एकुण २५००० रु. माल ते कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरुण लेल्याचे दिसुन आले. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाख़ल |
| ६ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२४/२३ कलम ३८० भादवी | भोंदु लेआउट साई नगर अमरावती | दि. ०८/०९/२३ चे ०७.३० ते ०८.३० वा. दरम्यान दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १८.३४ | प्रवीण हनुमंतराव चिंचे वय ४० रा. साई नगर अमरावती | अज्ञात | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्याचे राहते घराचे समोरील हॉल मध्ये विवो कंपनीचा मोबाईल किं. ५००० रु. २. पोको कंपनीचा मोबाईल किं. १०००० रु असा एकुण १५००० रु माल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुण नेला. सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता मोबाईल चोरुण नेणारा इसम वय अंदाजे २० वर्ष असा दिसुन आला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाख़ल |

अपधातः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ८२५/२३ कलम २७९, ३३७, ३३८ भादवी | श्रीकष्ण मंदीर समोर हायवे रोडवर अमरावती | दि. ०२/०९/२३ चे २०.३० ते २१.०० वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे १९.३९ | जिवन रामचंद्र दिपके वय ४८ रा. सामरा नगर अमरावती | चार चाकी वाहन क्रं.MH१२MR२६५० चा चालक | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे घरी हजर असतांना त्याच्या मुलाचे मित्राचा फोन आला व सांगितले प्रज्योत याचा अपघात झाला व त्याला ईर्विन दवाखाना येथे भरती केले वरुण फिर्यादी व त्याची पत्नी दवाखान्यात गेले असता त्याच्या मुलाला डोक्याला व तोंडाला मार होता उजवा पाय फॅक्चर झाल्याचे दिसुन आले त्याचे मित्राने सांगितले की हा रोडच्या कडेला उभा असतांना श्रीकष्ण मंदीरा समोर हायवे रोड वर चार चाकी वाहन क्रं.MH१२MR २६५० चा चालका ने भरधाव वेगाने गाडी चालवुन अपघात केला अशा फिर्यादीच्य जबाणी रिपोर्ट वरुण सदरचा गुन्हा दाखल |

ईतरः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप न ७३२/२०२३ कलम ५०४, ५०६(ब) भादवी | पंचशील नगर महात्मा फुले सभागृह जवळ अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे १८.०० वा.<br><br>रि ता वेळ दि ०८/०९/२०२३ चे २१.३७ वा. | आकाश यशवंत सिंगाडे वय २८ वर्ष धंदा पानठेला रा. पंचशील नगर महात्मा फुले सभागृह जवळ अमरावती | रितीक सिध्दार्थ भालेकर वय २१ वर्ष रा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि फिर्यादीचा त्याचे घराजवळ पानठेला असुन तो पानठेला चालवीतो फिर्यादी व आरोपी हा एकाच मोहल्यात राहत असुन यातिल आरोपी हा गुन्हेगार वृत्तीचा असुन त्याचेवर गुन्हे दाखल आहेत नमुद घ ता वेळी व ठिकानी यातिल आरोपी हा फि च्या पानठेल्यावर आला फि ला उधार खर्रा दे असे म्हटले असता फि ने त्यावर म्हटले कि पैसे दे त्यावर आरोपीने फि स म्हटले कि माझयावर तुझे हजार दोनहजार रूपये आहे काय असे म्हणुन फि च्या अंगातील टिशर्ट ची कॉलर पकडुन ओढवाड करून शिवीगाळ केली व तुला चाकुने जिवाने मारून टाकतो अशी धमकी दिली व पुन्हा थोडयावेळाने येतो असे सांगुन निघुन गेला अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप न ७३३/२०२३ कलम २८३ भादवी | मालटेकडी बस स्टॅन्ड रोड अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे २०.१५ वा.<br><br>रि ता वेळ दि ०८/०९/२०२३ चे २२.०७ वा. | सरतर्फे पोहेकॉ प्रेम वानखडे बन ८०७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | हसनेन मलीक वल्द ईक्बाल मलीक वय ६१ वर्ष रा हबीब नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टेहददीत पायदळ पेट्रोलींग करीत असतांना नमुद घ ता वेळी व ठिकानी फिर्यादी मालटेकडी बसस्टॅन्ड रोड अमरावती येथे पायदळ पेट्रोलींग दरम्यान गेले असता एक इसम हा आपल्या ताब्यातिल वाहन हे लोटगाडी चारचाकी ज्युस सेन्टर मलीक हा त्याचे वाहन आमरोडवर धोका दायक स्थीतीत उभे करून वाहतुकिस अडथडा निर्माण करतानां दिसुन आला वरून आरोपीचे हे कृत्य कलम २८३ भादवी प्रमाणे होत असल्याने फिय्रादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप न ७३४/२०२३ कलम २८३ भादवी | मालटेकडी रोड अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे २०.०० वा.<br><br>रि ता वेळ दि ०८/०९/२०२३ चे २२.३७ वा. | सरतर्फे सपोउपनी श्रीरंग गाढवे बन ६१६ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | साबिर अली वल्द मोबिनउददीन वय ६० वर्ष रा अलीम नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पायदळ पेट्रोलींग करीत असतांना नमुद घ ता वेळी व ठिकानी फिर्यादी मालटेकडी बसस्टॅन्ड रोड अमरावती येथे पायदळ पेट्रोलींग दरम्यान गेले असता एक इसम हा आपल्या ताब्यातिल वाहन हे लोटगाडी चारचाकी ज्युस सेन्टर मलीक हा त्याचे वाहन आमरोडवर धोका दायक स्थीतीत उभे करून वाहतुकिस अडथडा निर्माण करतानां दिसुन आला वरून आरोपीचे हे कृत्य कलम २८३ भादवी प्रमाणे होत असल्याने फिय्रादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | **पोस्टे राजापेठ अप क्रं. ८१८/२३ कलम ४४८, ४२७, ३४ भादवी** | **रुद्र साई अपार्टमेन्ट सामरा नगर अम.** | **दि. ०६/०९/२३ चे २०.३० वा. दरम्यान**<br><br>**दा. ता. वेळ ०८/०९/२३ चे ००.२१** | **राहुल दिलीप वैदय वय ३५ वर्ष् रा. ४०९ रुद्र साई अपार्टमेन्ट सामरा नगर अम.** | **भारत चौधरी व सुरज चौधरी त्यांचे दोन साथीदार** | **हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांची घराचे मालकी हक्का बाबत कोर्टात केस सुरु आहे नमुद घ. ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीस नातेवाईकाने फोन करुण सांगितले की अपार्टमेन्टच्या खाली एक टक उभा असुन तुमचे फलॅट मध्ये एक दाढी वाला इसम व एक बॉडी बिल्डर असलेला इसम व त्याचे दोन साथीदार हे लॉक तोडुन घुसले आहे व सामान खाली उतरवुन टक मध्ये भरत आहे. तशी माहिती मी माझे भावाला फोनवर दिली भावाने राजापेठ पोलीस स्टेशनला दिली त्यावरुण पोलीस तेथे गेले व उभा असलेला टक थांबवुन ठेवला माझ्े काही सामान टकमध्ये व उर्वरीत सामान पार्कींग मध्ये आहे. माझे नातेवाईकांनी सांगितलेल्या इसमाचे वर्णन हे नमुद आरोपी प्रमाणे आहे माझ्े घरामध्ये माझ्या परवानगी विना प्रवेश करुण माझ्े घराचे सामान घराचे बाहेर टक मध्ये नेत असतांना अंदाजे १५००० ते** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | २०००० चे नुकसान केले अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने गुन्हा दाखल |

**अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळी दा ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | पोस्टे राजापेठ मर्ग क्रं. ९१/२३ कलम १७४ जाफौ | श्रीकष्ण हॉस्पीटल अमरावती | घ.ता.वेळ ०७/०९/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान दा.ता. वेळ ०८/०९/२०२३ चे १२.४५ | एक महिला | पिडीत महिलेचा भाऊ | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी पोस्टेला येवुन जबाणी रिपोर्ट दिला की त्यांची बहीण अमरावती येथे राहते तिची तब्येत दि. ०५/०९/२०२३ रोजी बैलोलपुर येथे शेतीचे भुमापन करतांना अचानक जास्त बिघडल्याने तिला तिचे सहकारी व फिर्यादी यांनी श्रीकष्ण हॉस्पीटल अमरावती येथे भरती केले व ती उपचारा दरम्यान ०७/०९/२०२३ रोजी १७.३० वा. दरम्यान मरण पावली तिचे मरणाबाबत कुणावरही संशय नाही अशा जबाणी रिपोर्ट वरुण सदरचा मर्ग दाखल करुण तपासात घेतला. |

**प्रोव्हीशन रेड :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप न ७२९/२०२३ कलम ६५ (ई) म.दा.का | अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे १३.०० वा. ते १३.४५ वा | दि ०८/०९/२०२३ चे १८.१६ वा. | सरतर्फे नापोकॉ एजाज शहा मदार शहा बन २०४ गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहीतीचे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष प्रो रेड केली असता नमुद आरोपी हा विनापरवानाअवैधरित्या दारुची विक्री करतांना मिळुन आली नमुद आरोपीचे कब्जातुन पंचांसमक्ष देशी दारू बॉबी संत्रा ची १८० एमएल च्या १५ नग पावटया कि अ १२००/—रू.चामाल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने फिय्रादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप न ७३०/२०२३ कलम ६५ (ई) म.दा.का | अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे १३.५० वा. ते १४.४० वा | दि ०८/०९/२०२३ चे १८.५६ वा. | सरतर्फे नापोकॉ गजानन नामदेवराव ढवले बन १६९ गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहीतीचे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष प्रो रेड केली असता नमुद आरोपी हा विनापरवानाअवैधरित्या दारुची विक्री करतांना मिळुन आली नमुद आरोपीचे कब्जातुन पंचांसमक्ष देशी दारू टॅगो पंच ची ९० एमएल च्या ३० नग पावटया कि अ १२००/— रू.चा माल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने फिय़ादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप न ७३१/२०२३ कलम ६५ (ई) म.दा.का. | अमरावती | दि ०८/०९/२०२३ चे १६.४५ वा. | दि ०८/०९/२०२३ चे २०.०६ वा. | सरतर्फे पोहेकॉ सुनील सोळंके ब नं २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहीतीचे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष प्रो रेड केली असता नमुद आरोपी हा विनापरवाना अवैधरित्या दारुची विक्री करतांना मिळुन आली नमुद आरोपीचे कब्जातुन पंचांसमक्ष देशी दारू बॉबी संत्रा ची १८० एमएल च्या ११ नग पावटया कि अ ७७०/—रू.चा माल जप्त करण्यात आला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने फिय़ादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | वलगाव | अप क्र.292/2023 कलम 65 ई म.दाका. प्रमाणे दाखल. | ग्राम पुसदा. | दि.08/09/2023 17-00 वा. | दि.08/09/2023 चे 20/49 वा. | सरतर्फे – पोहेकॉं इशय खांडे ब.न.1205 पोस्टे वलगाव अम शहर. | प्रविन गंगाधरराव चोपडे वय 38 वर्ष रा.ग्राम पुसदा. | हकिकत आशा प्रकारे आहे .नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील यातील फिर्यादि यांची पोस्टे ला हजर ड्युटी असतांना गुप्त बातमी दारा करुन माहिती दिली कि.एक ईसम ग्रान पुसदा येथे अवैद्य रित्या देशी दारु ची विक्रि करितआ अशा माहि ती वरुन सदर आरोपि वर प्रो रेड केली असता.त्याचे ताब्यातील पांढ-या रंगाच्या पिशविची पाहणी केली असता.त्या मध्ये देशी दारु च्या 90 मीली च्या पावव्या कि.अ.400/रु चा माल जप्त करुन पोस्स्टे ला जमा करम्यात आ.अशा फिर्यादिच्या जबानी रिपोरट् वरुन सदर चा गुन्हा दाखल झाला. रुन सदर चा गुन्हा दाखल |